जनसेवा शिक्षण मंडळाचे,

# शांतारामभाऊ घोलप कला, विज्ञान व गोटीरामभाऊ पवार वाणिज्य महाविद्यालय

शिवळे, ता. मुरबाड

मराठी विभाग

**मराठी वाङ्मय मंडळ उद्घाटन**

अहवाल २०२४-२५

**दि. १८/१२/२०२४**

जनसेवा शिक्षण मंडळाचे शांतारामभाऊ घोलप कला, विज्ञान व गोटीरामभाऊ पवार वाणिज्य महाविद्यालय, शिवळे, मराठी विभाग आयोजित मराठी वाङ्मय मंडळाचे उद्घाटन लोकसाहित्याचे अभ्यासक डॉ. दिलीप कसबे (चाकण, पुणे) यांच्या हस्ते संपन्न झाले. अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एम. ए. बडगुजर होते. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक मराठी वाङ्मय मंडळाचे अध्यक्ष डॉ. संदीप चपटे यांनी केले. मराठी विभाग प्रमुख डॉ. संजय चिताळकर यांनी प्रमुख अतिथींचा परिचय करून दिला. डॉ. दिलीप कसबे यांनी आपल्या व्याख्यानात लोकगीते सादर करून रंगत आणली. तसेच लोकसाहित्याच्या अभ्यासाचे महत्त्व विद्यार्थ्यांना सांगितले.विद्यार्थ्यांना वाचन संस्कृती जतन करण्याचे आवाहन त्यांनी केले.

याप्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. बडगुजर यांनी मराठी भाषा व संस्कृती यांचा अभिमान बाळगणे आवश्यक असल्याचे प्रतिपादन केले. कार्यक्रमाच्या प्रारंभी योगिता देसले यांनी इशस्तवन सादर केले. या कार्यक्रमाला विद्यार्थी ५१ उपस्थित होते. तसेच प्राध्यापक व शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते. सूत्रसंचालन व आभार प्रा. विनोद पाटील यांनी केले.

मराठी वाङ्मय मंडळ प्रमुख

प्राचार्य

प्राचार्य
जनसेवा शिक्षण मंडळ मुरबाड संचलित,
शांतारामभाऊ घोलप कला, विज्ञान व
गोटीरामभाऊ पवार वाणिज्य महाविद्यालय
शिवळे, ता. मुरबाड, जि. ठाणे.४२१४०१.

CamScanner

# मराठी वाङ्मय मंडळाचे क्षणचित्रे











CamScanner

जनसेवा शिक्षण मंडळाचे,

# शांतारामभाऊ घोलप कला, विज्ञान व गोटीरामभाऊ पवार वाणिज्य महाविद्यालय शिवळे ता. मुरबाड

## मराठी विभाग

## मराठी भाषा संवर्धन पंधरवडा

१४ जानेवारी ते २८ जानेवारी २०२५

## अहवाल

सन - २०२४ -२०२५

दि. ३०/०१/२०२५

आपल्या महाराष्ट्र राज्याची राजभाषा मराठीचे जतन, जागृती व संवर्धन होण्याच्या उद्देशाने महाराष्ट्रामध्ये दरवर्षी १४ जानेवारी ते २८ जानेवारी या काळात 'मराठी भाषा संवर्धन पंधरवडा' साजरा करण्यात येतो. त्याप्रमाणे याही वर्षी तो जनसेवा शिक्षण मंडळाचे शांतारामभाऊ घोलप कला, विज्ञान व गोटीरामभाऊ पवार वाणिज्य महाविद्यालय, शिवळे, येथील मराठी विभागाच्या वतीने उत्साहात साजरा करण्यात आला. या पंधरवड्यात घेण्यात आलेल्या कार्यक्रमांचा अहवाल संक्षिप्त स्वरूपात पुढील प्रमाणे.

१) निबंध स्पर्धा -

गुरुवार ,दिनांक १६/०१/२०२५ रोजी निबंध स्पर्धा घेण्यात आली. विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव देण्यासाठी त्यांच्यामध्ये लेखन कौशल्य विकसित करण्यासाठी स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. या स्पर्धेचे विषय पुढील प्रमाणे होते.

१) एकविसाव्या शतकातील भारत

२) मराठी राजभाषा

३) आपली भारतीय संस्कृती

या स्पर्धेमध्ये एकूण २७ विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला.

२) हस्ताक्षर स्पर्धा -

सोमवार, दिनांक. २०/०१/२०२५ रोजी आयोजित करण्यात आली होती. विद्यार्थ्यांना सुंदर व सुवाच्य हस्ताक्षराला प्रोत्साहन देणे आणि लेखन कौशल्य विकसित करणे. त्यांचा बौद्धिक व व्यक्तिमत्व विकास घडविण्यासाठी हस्ताक्षर हा महत्त्वाचा भाग आहे. त्यामुळे या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. या स्पर्धेमध्ये एकूण २८ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला.

३) शुद्धलेखन स्पर्धा-

CamScanner

सोमवार दिनांक. २०/०१/२०२५ रोजी आयोजित करण्यात आली होती. शुद्धलेखन स्पर्धा हा विद्यार्थ्यांसाठी एक उपयुक्त आणि शैक्षणिक दृष्ट्या महत्त्वाचा उपक्रम घेण्यात आला. त्यामुळे भाषेवरील प्रभुत्व वाढते, संवाद कौशल्य सुधारते, स्पर्धात्मक गुण विकसित होतात. एकाग्रता आणि निरक्षण शक्ती वाढते. लिहिण्याची सवय वाढते. भाषेची शुद्धता आणि शब्दसंग्रह वाढवण्यासाठी तसेच दैनंदिन जीवनातही या स्पर्धेचा फायदा विद्यार्थ्यांना होईल. या स्पर्धेमध्ये एकूण २२ विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला.

४) कथाकथन स्पर्धा -

मंगळवार दिनांक. २८/०१/२०२५ रोजी 'कथाकथन' स्पर्धा ही स्पर्धा घेण्यात आली. विद्यार्थ्यांमध्ये आत्मविश्वास, सृजनशीलता आणि प्रभावी कथालेखन कौशल्य विकसित करण्यासाठी महत्त्वाची आहे. कथा सांगणे ही एक प्राचीन कला असून, ती अभिव्यक्ती, भाषाशुद्धता आणि संवाद क्षमतेवर परिणाम घडविते. ही स्पर्धा संवाद भाषा आणि सृजनशीलतेची बीजे रोवते, त्यामुळे एखादा विद्यार्थी भविष्यात चांगला कथालेखक होऊ शकतो. तसेच विविध क्षेत्रांमध्ये यशस्वी होण्यासाठी मदत होऊ शकते. या स्पर्धेमध्ये एकूण १८ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला.

५) काव्यवाचन स्पर्धा -

मंगळवार दिनांक. २८/०१/२०२५ रोजी 'काव्यवाचन' स्पर्धा घेण्यात आली. या स्पर्धेमुळे विद्यार्थ्यांमध्ये साहित्य प्रेम, अभिव्यक्ती कौशल्य आणि आत्मविश्वास वाढीस लागेल. कविता वाचन हे केवळ शब्द उच्चारून नव्हे, तर त्यामधील भावना,लय आणि गेयता यांचे प्रभावी यांचे प्रभावी सादरीकरण असते. या स्पर्धेमुळे विद्यार्थ्यांमध्ये भाषा, अभिव्यक्ती, आत्मविश्वास आणि साहित्याची गोडी वाढवून भविष्यातील यशासाठी एक मजबूत पाया तयार करेल असे वाटते.

या विविध स्पर्धांसाठी मराठी विभाग प्रमुख डॉ. संजय चिताळकर यांनी 'मराठी भाषा संवर्धन पंधरवडा साजरा करण्यामागील भूमिका व मराठी भाषकांची जबाबदारी स्पष्ट करून स्पर्धकांना शुभेच्छा दिल्या.

या विविध स्पर्धांसाठी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एम. ए. बडगुजर, उप.प्राचार्य डॉ.जी.आर.विशे यांचे विशेष सहकार्य लाभले. मराठी वाड;मय मंडळाचे अध्यक्ष डॉ. संदीप चपटे, ग्रंथपाल श्री. एन. डी. फड, प्रा.एम. व्ही.पवार, डॉ.एस.एम.बिराजदार,प्रा.पवन रोठे, डॉ.एल.आर. संते, सुतीका झुंजारराव यांची उपस्थिती लाभली. सदर कार्यक्रमासाठी व विविध स्पर्धांसाठी महाविद्यालयतील सर्व प्राध्यापक,शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

डॉ.संदीप चपटे
अध्यक्ष.
मराठी वाड;मय मंडळ

डॉ.एम.ए. बडगुजर
प्राचार्य

प्राचार्य
जनसेवा शिक्षण मंडळ मुरबाड संचलित,
शांतारामभाऊ घोलप कला, विज्ञान व
गोटीरामभाऊ पवार वाणिज्य महाविद्यालय
शिवळे, ता. मुरबाड, जि. ठाणे.४२१४०१.

CamScanner

## मराठी भाषा संवर्धन पंधरवडा क्षणचित्रे













CamScanner

जनसेवा शिक्षण मंडळाचे,

# शांतारामभाऊ घोलप कला, विज्ञान व गोटीरामभाऊ पवार वाणिज्य महाविद्यालय शिवळे ता. मुरबाड

## मराठी विभाग

## 'मराठी भाषा गौरव दिन'

## अहवाल २०२४-२५

**दि. २७/०२/२०२५**

जनसेवा शिक्षण मंडळाचे शांतारामभाऊ घोलप कला, विज्ञान व गोटीरामभाऊ पवार वाणिज्य महाविद्यालय, शिवळे मराठी वाङ्मयमंडळ आयोजित, गुरुवार दि. २७/०२/२०२५ रोजी कविवर्य कुसुमाग्रज यांच्या जयंती निमित्त 'मराठी भाषा गौरव दिन' साजरा करण्यात आला. गुरुवार दि. २७/०२/२०२५ रोजी मराठी भाषा गौरव दिनाचे  औचित्य साधून लेखक डॉ. यशवंत सुरोशे लिखित 'सुवास रातराणीचा' हा कथासंग्रह जेष्ठ समीक्षक डॉ. सतिश बडवे यांच्या हस्ते प्रकाशित करण्यात आला. या कथासंग्रहाचे प्रकाशन ठाणे येथील अनघा प्रकाशनाने केले आहे. मराठी भाषेचा अभिमान जतन केला पाहिजे केले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एम. ए. बडगुजर होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक मराठी विभाग प्रमुख डॉ.संजय चिताळकर यांनी केले. तसेच प्रमुख वक्ते डॉ.सतिश बडवे यांचा परिचय डॉ. संदीप चपटे यांनी करून दिला.

याप्रसंगी उपप्राचार्या डॉ. गीता विशे व अनघा प्रकाशनाचे संचालक श्री अभय नाले यांनी मनोगत व्यक्त केले. प्रमुख वक्ते डॉ. सतिश बडवे यांनी, "लेखक ज्या मातीत घडतो, त्याचेच चित्रण साहित्यात करतो. यशवंत सुरोशे यांनी आपल्या कथेत स्त्रियांची बदलती रूपे अनुभव व निरीक्षणे शब्दबध्द केली आहे." असे प्रतिपादन केले. या कार्यक्रमाला हिंदी विभागाचे डॉ. प्रकाश धुमाळ मराठी विभागाचे प्राध्यापक एम व्ही पवार, राज्यशास्त्र विभागाचे प्रा.पी. डी.सोनवणे, प्रा. रोहित पवार उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मधुकर पवार यांनी केले, तर आभार प्रा. विनोद पाटील यांनी मानले. कार्यक्रमाला प्राध्यापक, शिक्षकेत्तर कर्मचारी व ७५ विद्यार्थी उपस्थित होते.

मराठी विभाग प्रमुख

प्राचार्य

प्राचार्य
जनसेवा शिक्षण मंडळ मुरबाड संचलित,
शां... घोलप कला, विज्ञान व
गो... पवार वाणिज्य महाविद्यालय
शिवळे, ता. मुरबाड, जि. ठाणे.४२१४०१.

मराठी भाषा गौरव दिनाचे क्षणचित्रे













CamScanner